| अ.क्र. | पदाचे नाव | किमान शैक्षणिक अर्हता | अनुभव | प्राधान्य | दरमहा मानधन | पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | सनियंत्रण व मूल्यमापन सल्लागार | कोणत्याही विषयातील पदवी किमान ५०% गुणांसह व संगणकाचे MS Office चे ज्ञान आवश्यक | स्वयंसेवी संस्था अथवा शासकीय विभागांमधील MIS व संनियंत्रणा बाबतच्या कामाचा जिल्हा स्तरावरील किमान २ वर्षाचा अनुभव | जलस्वराज्य अथवा तत्सम सहभागात्मक विकासाच्या कार्यक्रमामधील जिल्हा स्तरावरील अनुभव | रु.१५,००० | ०१ |
| ३ | समाज शास्त्रज्ञ | कोणत्याही विषयातील पदवी किमान ५०% गुणांसह अधिक M.S.W. किंवा M.A. समाज शास्त्र व संगणकाचे MS Office चे ज्ञान आवश्यक | स्वयंसेवी संस्था अथवा शासकीय विभागांमधील पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रातील कामाचा जिल्हा स्तरावरील किमान २ वर्षाचा अनुभव | जलस्वराज्य अथवा तत्सम सहभागात्मक विकासाच्या कार्यक्रमामधील जिल्हा स्तरावरील अनुभव | रु.१५,००० | ०१ |
| ४ | मनुष्यबळ विकास सल्लागार | कोणत्याही विषयातील पदवी किमान ५०% गुणांसह अधिक M.S.W. अथवा B.E./B.Tech अथवा M.B.A. व संगणकाचे MS Office चे ज्ञान आवश्यक | स्वयंसेवी संस्था अथवा शासकीय विभागांमधील पाणी पुरवठा व् स्वच्छता क्षेत्रातील प्रशिक्षणाचे नियोजन व अंमलबजावणी बाबतच्या कामाचा जिल्हा स्तरावरील किमान २ वर्षाचा अनुभव | जलस्वराज्य अथवा तत्सम सहभागात्मक विकासाच्या कार्यक्रमामधील जिल्हा स्तरावरील अनुभव | रु.१५,००० | ०१ |
| ५ | पाणी गुणवत्ता तज्ञ | एनव्हायरनमेंटल केमेस्ट्री किंवा ॲनालिटिकल केमेस्ट्री किंवा जिओ केमेस्ट्री किंवा मायक्रो बायोलॉजी मधील पदवी व संगणकाचे MS Office चे ज्ञान आवश्यक | पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण क्षेत्रामधील कामाचा जिल्हा स्तरावरील किमान २ वर्षाचा अनुभव | जलस्वराज्य अथवा तत्सम सहभागात्मक विकासाच्या कार्यक्रमामधील जिल्हा स्तरावरील अनुभव | रु.१५,००० | ०१ |

| अ.क्र. | पदाचे नाव | किमान शैक्षणिक अर्हता | अनुभव | प्राधान्य | दरमहा मानधन | पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | वित्त नि संपादणूक अधिकारी | वाणिज्य शाखेतील पदवी किमान ५०% गुणांसह व संगणकाचे MS Office चे ज्ञान आवश्यक | स्वयंसेवी संस्था अथवा शासकीय विभागांमधील कामाचा जिल्हा स्तरावरील किमान २ वर्षाचा अनुभव | जलस्वराज्य अथवा तत्सम सहभागात्मक विकासाच्या कार्यक्रमामधील जिल्हा स्तरावरील अनुभव | रु.१५,००० | ०१ |
| ७ | डेटा एन्ट्री ऑपरेटर | कोणत्याही विषयातील पदवी किमान ५०% गुणांसह व संगणकाचे MS Office चे ज्ञान आवश्यक | स्वयंसेवी संस्था अथवा शासकीय विभागांमधील कामाचा किमान २ वर्षाचा अनुभव | जलस्वराज्य अथवा तत्सम सहभागात्मक विकासाच्या कार्यक्रमामधील जिल्हा स्तरावरील अनुभव | रु.१२,००० | ०१ |
| ८ | शिपाई | ७ वी उत्तीर्ण | स्वयंसेवी संस्था अथवा शासकीय विभागांमधील कामाचा किमान २ वर्षाचा अनुभव | जलस्वराज्य अथवा तत्सम सहभागात्मक विकासाच्या कार्यक्रमामधील जिल्हा स्तरावरील अनुभव | रु.८,००० | ०१ |

**वयोमर्यादा:- वरील सर्व पदांसाठी उच्चतम वयोमर्यादा ४० वर्षे राहील.**

**(१) प्रोत्साहन मानधन :**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांनी जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन कक्षामधील विषयतज्ञ/सल्लागार यांच्या नियुक्ती कालावधीचे उद्दिष्ट निश्चित करुन उद्दिष्ट पुर्तीचा मासिक व त्रैमासिक आढावा घ्यावा. या आढाव्यात विषयतज्ञ/सल्लागार यांचे काम समाधानकारक आढळल्यास त्यांना प्रोत्साहन मानधन प्रतिमाह प्रत्येकी रु.५,०००/- इतके अदा करावे.

**(२) वार्षिक मानधन वाढ :**

जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन कक्षामधील जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, विषयतज्ञ, सल्लागार, लेखाधिकारी, डेटा एंट्री ऑपरेटर व शिपाई यांना दरवर्षी मानधनात (प्रोत्साहन मानधन वगळून) ८% वार्षिक वाढ अनुज्ञेय राहील. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांनी सर्व संबंधितांच्या कामांचे मुल्यमापन करुन ते समाधानकारक असल्यास त्यांना ८% मानधन वाढीसह मुदतवाढ देण्याचा अथवा त्यांच्या ऐवजी नवीन नियुक्ती करण्याचा निर्णय स्वत:च्या स्तरावर घ्यावा.

**(३) नवीन नियुक्ती :** जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन कक्षातील विषयतज्ञ, सल्लागार, लेखाधिकारी, डेटा एंट्री ऑपरेटर व शिपाई यांच्या नियुक्त्या कंत्राटी पध्दतीने ११ महिन्यांकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा

परिषद, पालघर यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत करण्यात यावी. या कक्षातील कर्मचाऱ्यांचे काम समाधानकारक असल्यास त्यांना एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन मुदतवाढ देण्याचा अथवा त्यांच्या जागी नवीन नियुक्ती करण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांना राहील.

**(४) कर्मचारी निवड पद्धती :**

जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन कक्षातील सल्लागारांच्या व इतर कर्मचाऱ्यांच्या निवडीसाठी जिल्हा परिषद, पालघर स्तरावर खालीलप्रमाणे निवड समिती स्थापन करण्यात यावी.

| अ.क्र. | पदनाम | समितीमधील पद |
|---|---|---|
| १ | **मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर** | **अध्यक्ष** |
| २ | विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ३ | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) | सदस्य |
| ४ | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत/पाणी व स्वच्छता) | सदस्य |
| ५ | जिल्हा आरोग्य अधिकारी | सदस्य |
| ६ | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग | सदस्य सचिव |

वरील पदांसाठी उमेदवारांची निवड करण्याकरीता जिल्हास्तरांवरुन सर्वाधिक खपाच्या एका मराठी व एका इंग्रजी दैनिक वृत्तपत्रात संक्षिप्त जाहिरात द्यावी. तसेच जिल्ह्याच्या (जिल्हा परिषदेच्या) संकेतस्थळावर देखील सविस्तर जाहिरात प्रसिध्द करण्यात यावी. या जाहिरातीस अनुसरुन उमेदवारांनी त्यांचे अर्ज विहित नमुन्यात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांच्याकडे सादर करणे आवश्यक राहील.

प्राप्त झालेल्या अर्जांच्या छाननी नंतर पात्र ठरलेल्या उमेदवारांकरीता ६० गुणांची बहुपर्यायी वस्तुनिष्ठ लेखी परिक्षा व २५ गुणांची तोंडी परिक्षा पुढीलप्रमाणे ठेवण्यात यावी.

**लेखी परीक्षा**

| अ.क्र. | विषय | गुण |
|---|---|---|
| १ | सामान्य ज्ञान | १० |
| २ | बौध्दीक व विश्लेषणात्मक क्षमता | १० |
| ३ | गणितीय क्षमता | १० |
| ४ | विषयाचे ज्ञान | १० |
| ५ | संगणकाचे ज्ञान | ०५ |
| ६ | स्थानिक बाबींचे ज्ञान | ०५ |
| **एकूण प्रश्न : ६०, एकूण गुण : ६०, परिक्षेचा कालावधी: १ तास** | | |

**तोंडी परीक्षा**

| अ.क्र. | विषय | गुण |
|---|---|---|
| १ | किमान शैक्षणिक अर्हता (टक्केवारी नुसार) | ०५ |
| २ | उच्च शैक्षणिक अर्हता (टक्केवारी नुसार) | ०५ |
| ३ | अनुभव | १० |
| ४ | व्यक्तिमत्व | ०५ |
| **एकूण** | | **२५** |

लेखी परिक्षेमधून एकास पाच (सर्वाधिक गुण मिळविणारे ५ उमेदवार) या प्रमाणात उमेदवारांना मुलाखतीसाठी आमंत्रीत करण्यात यावे. लेखी परिक्षेच्या प्रश्न पत्रिका तयार करुन उत्तरपत्रिका तपासणीची जबाबदारी जिल्हा स्तरावरील निवड समितीची राहील. उत्तर पत्रिकांची तपासणी शक्यतो संगणकीय पध्दतीने (OMR) करावी. लेखी परिक्षेच्या प्रश्न पत्रिकांची गोपणीयता अबाधित राखणे ही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांची वैयक्तिक जबाबदारी राहिल.

उपरोक्त पदे ही खुल्या बाजारातून कंत्राटी पध्दतीने अकरा महिन्यांकरीता भरण्यात यावी. त्यांचे वेतन व भत्ते केंद्र शासनाच्या राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत राज्य शासनास प्राप्त होणाऱ्या सहाय्य निधीतून (SUPPORT FUND) भागविण्यात यावेत. त्यासाठी जिल्हा परिषदेकडून मागणी आल्यानंतर या विभागातील पापु-१० व पापु-१६ कार्यासनांमार्फत पालघर जिल्हा परिषदेस निधी वितरीत करण्यात येईल.

वरील प्रमाणे नियुक्त करण्यात आलेल्या सल्लागार व इतर कर्मचाऱ्यांशी जिल्हा परिषद, पालघरचे मुख्य कार्यकारी अधिकारी विहित नमुन्यात करार पत्र करतील. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर हे ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाशी संबंधीत मासिक आढावा बैठकीमध्ये या कर्मचाऱ्यांच्या कामाचा आढावा घेतील. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पालघर यांनी हा मासिक आढावा केंद्र शासनाने जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता मिशनच्या मासिक बैठकीसाठी तयार केलेल्या कार्यक्रम पत्रिकेनुसार घ्यावा. राज्य स्तरावरुन संचालक, राज्य पाणी पुरवठा व सहाय संस्था (वासो) हे त्यांच्या कामाचा नियमित आढावा घेतील.

**(५) जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक :**

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षा करीता एका जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापकाची नियुक्ती करण्यात येईल. ही नियुक्ती कंत्राटी पध्दतीने अकारा महिन्यांकरीता राज्य पाणी पुरवठा व सहाय संस्था (वासो) मार्फत करण्यात येईल. या पदाची शैक्षणिक अर्हता, अनुभव, मानधन व कामाचे स्वरुप पुढील प्रमाणे राहिल.

| पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | वयोमर्यादा | अनुभव | मानधन (प्रतिमाह) |
|---|---|---|---|---|---|
| जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक | ०१ | कोणत्याही शाखेतील किमान ५० टक्के गुणांसह पदवी + MBA (HR) प्रधान्य: BE (CIVIL)+ MBA (HR) | अधिकतम ४० वर्ष | ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रातील शासकीय विभागातील कामाचा किमान २ वर्ष | रु. ३००००+ प्रोत्साहन भत्ता (रु. ५०००) व वार्षिक ८ टक्के मानधन वाढ (प्रोत्साहन भत्त्याचे नियम इतर तज्ञ, सल्लागार यांच्याप्रमाणे) |

**जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापकांच्या कामाचे स्वरूप :**

१. जिल्हा पातळीवर जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाच्या दैनंदिन कामाचे सनियंत्रण करण्यास उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत/ पाणी व स्वच्छता) यांना मदत करणे.

२. जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाचे सल्लागार / विषयतज्ञ यांच्या नियुक्ती कालावधीचे उद्दिष्ट निश्चित करण्यास उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत/ पाणी व स्वच्छता) यांना मदत करणे.

३. जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाचे सल्लागार/ विषयतज्ञ यांच्या कामाचा मासिक/ त्रैमासिक आढावा घेण्यास उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत/ पाणी व स्वच्छता) यांना सहाय करणे.

४. जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाच्या वतीने विविध बैठकांना उपस्थित राहणे.

५. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत/ पाणी व स्वच्छता) यांच्याकडून वेळोवेळी विहित करण्यात येणारी कामे करणे.

**(६) करारपत्र/ बंधपत्र :**

जिल्हा पाणी व मिशन कक्षातील जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, विषयतज्ञ, सल्लागार, लेखाधिकारी, डेटा एन्ट्री ऑपरेटर व शिपाई यांना नियुक्ती/मुदतवाढ देतांना त्यांच्याकडून जोडपत्र-२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे स्टॅम्प पेपरवर करारपत्र/बंधपत्र लिहून घेण्यात यावे.

**(७) जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन कक्षातील शाखा :**

पालघर जिल्हापरिषदेच्या जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षामध्ये खालीलप्रमाणे शाखा स्थापन करण्यात याव्यात.

१) स्वच्छता शाखा (Sanitation Cell).
२) पाणी गुणवत्ता शाखा (Water Quality Cell).
३) माहिती-शिक्षण-संवाद शाखा (IEC Cell).
४) मनुष्यबळ विकास शाखा (HRD Cell).
५) संनियंत्रण व मुल्यमापन शाखा (M & E Cell).
६) वित्त शाखा (Finance Cell).
७) आस्थापना शाखा (Establishment Cell)

**(८) कर्तव्ये व जबाबदाऱ्या :**

जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद, पालघर येथे कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या सोबत जोडलेल्या **जोडपत्र-३** प्रमाणे राहतील.

**(९) संनियंत्रण :**

नियुक्ती नंतर या कर्मचाऱ्यांवर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, पालघर, व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत / पाणी व स्वच्छता), जिल्हा परिषद, पालघर यांचे संनित्रण राहिल. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, पालघर हे त्यांच्या दैनंदिन कामाचे संनियंत्रण करतील.

**(१०) रजा :**

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षामधील जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, विषयतज्ञ, सल्लागार, लेखाधिकारी, डेटा एन्ट्री ऑपरेटर, व शिपाई यांना दरवर्षी १० नैमित्तीक रजा व १५ वैद्यकिय रजा अनुज्ञेय राहतील.

**(११) प्रवास व दैनिक भत्ता :**

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षामधील जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, विषयतज्ञ, सल्लागार, लेखाधिकारी, डेटा एन्ट्री ऑपरेटर यांना शासकीय कामासाठी प्रत्यक्ष केलेल्या प्रवासाकरिता शासन सेवेतील **गट क** मधील कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या दराने प्रवास व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

**(१२) मोबाईल भत्ता :**

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षामधील जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, विषयतज्ञ, सल्लागार, लेखाधिकारी, डेटा एन्ट्री ऑपरेटर यांना दरमहा रु. ६००/- मोबाईल भत्ता अनुज्ञेय राहील.

**(१३) ओळखपत्र :**

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षामधील जिल्हा जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, विषयतज्ञ, सल्लागार, लेखाधिकारी, डेटा एन्ट्री ऑपरेटर व शिपाई यांना उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत/पाणी पुरवठा व स्वच्छता) यांच्या स्वाक्षरीने **जोडपत्र-४** मधील विहित नमुन्यात ओळखपत्र देण्यात यावे.

**(१४) बँक खाते :**

मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पालघर यांच्या नावे सहाय निधी बँक खाते व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत/पाणी पुरवठा व स्वच्छता) यांच्या नावे पाणी गुणवत्ता व संनियंत्रण निधी बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत उघडण्यात यावे. जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षामधील स्वच्छ भारत मिशनशी संबंधीत सल्लागारांचे/ कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते स्वच्छ भारत मिशन अंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीमधून तर राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाशी संबंधीत सल्लागारांचे/ कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत प्राप्त होणाऱ्या सहाय निधीमधून अदा करण्यात यावे. **या सर्व बँक खात्यांचे लेखे स्वतंत्रपणे ठेवण्यात यावेत.**

**(१५) जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाचे बळकटीकरण :**

पालघर जिल्हामध्ये जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष स्थापन करण्यासाठी रु. १०.०० लक्ष इतकी खर्चाची कमाल मर्यादा निश्चित करण्यात आली असून यामधून खालील कामे करण्यात यावीत.

१. **अस्तित्वातील कार्यालयीन जागेचे नुतनीकरण**
२. **टेबल-खुर्चीसह आवश्यक फर्निचर**
३. **वीज जोडणी**

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाचे कार्यालय जिल्हा परिषद पालघरच्या कार्यालयीन इमारतीतच स्थापन करणे बंधनकार आहे. स्थानिक परिस्थितीनुसार वरील कामाच्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्याचे अधिकार (वर नमूद केलेल्या कमाल खर्चाच्या मर्यादेत) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांना राहतील.

**(१६) वाहन :**

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद, पालघर यांच्याकरीता स्वच्छ भारत अभियानाच्या निधीमधून दोन वाहने भाडेतत्वावर घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. ही वाहने ८ ते १० आसन क्षमतेची असावीत व ही वाहने भाडेतत्वावर घेतांना विहित पारदर्शक कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

यान्यतिरिक्त या विभागामार्फत निर्गमित केलेले व भविष्यात निर्गमित केले जाणारे सर्व शासन निर्णय, परिपत्रके, सूचना, आदेश इत्यादी जिल्हा परिषद, पालघर व जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता मिशन कक्ष, पालघर यांना बंधनकारक राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201503031605511228 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SAVRIKAR AJAY KISHANRAO

Digitally signed by SAVRIKAR AJAY KISHANRAO
DN: CN = SAVRIKAR AJAY KISHANRAO, C = IN, S = Maharashtra, O = WATER SUPPLY AND SANITATION DEPARTMENT, OU = WATER SUPPLY AND SANITATION, CID - 917821
Date: 2015.03.03 16:42:43 +05'30'

**(अजय सावरीकर)**
उपसचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व सन्माननीय विधिमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई.
६. मा.मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
९. विभागीय आयुक्त (सर्व)
१०. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
११. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१२. संचालक, समाज कल्याण संचालनालय, पुणे.
१३. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय संस्था, बेलापूर, नवी मुंबई.
१४. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
१५. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
१६. मुख्य अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
१७. अधीक्षक अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.

१८.कार्यकारी अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
१९. कार्यकारी अभियंता (सर्व), ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
२०. मंत्रालयीन इतर सर्व विभाग व त्यांच्या अधिनस्त असलेली सर्व कार्यालये.
२१. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने.
२२. निवडनस्ती, कार्यासन पापु-०७.

## जोडपत्र-१

(शासन निर्णय क्रमांक : ग्रापाधो-१११५/प्र.क्र.२३/पापु-०७, दिनांक : ०३ मार्च, २०१५ चे जोडपत्र)

**मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर**

↓

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत/ पाणी व स्वच्छता)**

↓

**जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक**

↓

**जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष**

↓

| **स्वच्छता कक्ष** | **पाणी गुणवत्ता कक्ष** | **माहिती संवाद शिक्षण कक्ष** | **मनुष्यबळ विकास कक्ष** | **सनियंत्रण व मूल्यमापन कक्ष** | **लेखा शाखा** | **आस्थापना शाखा** |
|---|---|---|---|---|---|---|
| •समाज शास्त्रज्ञ<br>•स्वच्छता तज्ञ<br>•शालेय स्वच्छता व आरोग्य सल्लागार | •पाणी पुरवठा तज्ञ<br>•जलनिरीक्षक | •माहिती संवाद शिक्षण तज्ञ | •क्षमता बांधणी तज्ञ<br>•मनुष्यबळ विकास तज्ञ | •सनियंत्रण व मूल्यमापन तज्ञ | •वित्त नि संपादणूक सल्लागार<br>•लेखाधिकारी | •डेटा एन्ट्री ऑपरेटर<br>•शिपाई |

## जोडपत्र-२

(शासन निर्णय क्रमांक : ग्रापाधो-१११५/प्र.क्र.२३/पापु-०७, दिनांक : ०३ मार्च, २०१५ चे जोडपत्र)

**ZILLA PARISHAD PALGHAR**

**No.**
Rural Water Supply Division
Zilla Parishad, Palghar.
Dated:

**To,**
Shri, -------------

**Subject:** Contractual assignment as ---------------- for District Water & Sanitation Mission Cell, District Palghar.

1. Set out below are the terms and conditions under which Shri/Smt. __________ given this contractual assignment.

   His/her services on contract basis are presently required for District Water & Sanitation Mission Cell in Zilla Parishad, Palghar.

2. This Contractual assignment is given for a period of 11 months from the date ______________

3. Any decision taken on the basis of inputs pertaining to specific expertise possessed by the assignee appointed on contract, if results into a financial loss to the government, which if proved to have been caused due to lack of application of mind or dereliction of duty by him/her, the Zilla Parishad shall have right to fix the responsibility upon him/her and recover the loss from him/her.

4. **This contractual period of 11 months of the assignment may be shortened or terminated any time during this period depending upon the need and progress of the work,** In the event of the termination of this assignment before the agreed period, she/he will be paid for the service rendered by him/her for carrying out the assignment till the date of termination of the contract and she/he will hand over his/her charge to the person authorized by Chief Executive Officer, Zilla Parishad along with all the information and documentation possessed or gathered by him/her while rendering the service under this contract.

5. His/her services will be exclusively utilized for District Water & Sanitation Mission Cell in Palghar District under overall superintendence control and guidance of Chief Executive Officer, Zilla Parishad, Palghar and Deputy Chief Executive Officer (Panchayat/ Water and Sanitation) Zilla Parishad will have daily control over his/ her work. He/ She will perform his/ Her duties as per job chart given by Chief Executive Officer, Zilla Parishad and the State project management unit and shall be subject to performance appraisal. However, Chief Executive Officer, Zilla Parishad may assign him/her any other function responsibility or task as regards the overall implementation of water Supply and Sanitation Project in any part of the State.

6. Chief Executive Officer, Zilla Parishad will pay him/her directly a fixed consolidated remuneration of Rs. ____ per month during the contract period at the end of every month or thereof on his/her satisfactory performance of the assignment for that month. The above rate is subject to deduction of any taxes, which are required to be lawfully deducted from his/her, remuneration. The above remuneration may, positively be changed by the Water Supply and Sanitation Department if found necessary and it may be given effect at any point of time during this contract period.

7. No other remuneration, compensation or benefits are admissible to him/her for this contractual assignment.

8. If he/she desires to leave the assignment for any reason before the termination of contractual period, he/she will give three months' notice or deposit equivalent remuneration in lieu of notice.

9. All materials produced or acquired under the terms of this agreement written graphic, film and magnetic tape or otherwise, shall remain the property of Chief Executive Officer, Zilla Parishad, Water supply and Sanitation Department retains the exclusive right to publish or dissemination reports arising from such materials. His/her responsibility and duties in this paragraph shall continue, notwithstanding the termination of this contract for the execution of its other provisions.

10. He/she also agrees that all knowledge and information not within the public domain which may be acquired during the carrying out of this contract, shall be for all the times and for all purposes regarded as strictly confidential and held in confidence and shall not be directly or indirectly disclosed to any person whatever, except with the prior approval of Water Supply and Sanitation Department, Government of Maharashtra.

11. **Clear understanding is given that, this is purely a contractual engagement and it is not a permanent job with Government of Maharashtra.**

12. Shri/Smt. here by gives an undertaking that he/she will continue to serve the District Water and Sanitation Mission Cell for the said Period. His/her consolidated pay for a period of one month will be retained by the Chief Executive Officer, Zilla Parishad and shall be paid to him/her after the completion of the said period. It will be forfeited if he/she leaves the Project before the completion of said period.

13. Shri./Smt. ____________ will be given an Identity Card duly signed by Deputy Chief Executive Officer (Panchayat/ Water and Sanitation), Zilla Parishad after his/her contractual assignment and he/she hereby agrees that the said identity card shall be returned to the DWSM cell after his/her contractual period comes to an end or upon termination of his/her services whichever happens earlier, failing which his/her consolidated pay for a period of one month will be retained by the Chief Executive Officer, Zilla Parishad. It will be forfeited if he/she leaves the Project without returning I-Card.

14. Shri/Smt. ________ hereby agrees and gives undertaking that, he/she shall not put along claim whatsoever to regularize her/him in a permanent service.

15. Shri/Smt. _________ hereby agrees to carry out his/her assignment for District Water and Sanitation Mission, Zilla Parishad, Palghar on above terms and conditions and assures to

give his/her services, accordingly for the acceptance of which, he/she has put his/her signature below.

I agree and accept the assignment on above terms and conditions.

**Name:**

**Signature:**

**Place:**

**Date:**

**Note:** This draft is only indicative. The concerned Zilla Parishad may make necessary changes as per their requirement and as per the provision of GR.

## जोडपत्र-३

(शासन निर्णय क्रमांक : ग्रापाधो-१११५/प्र.क्र.२३/पापु-०७, दिनांक : ०३ मार्च, २०१५ चे जोडपत्र)

## जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद, पालघर यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या

### माहिती शिक्षण व संवाद शाखा

१. संपूर्ण स्वच्छता अभियान, पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण आणि राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम या तिन्ही कार्यक्रमांच्या संदेशकांचे समन्वयन करणे.

२. संपूर्ण स्वच्छता अभियान, पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण आणि राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम या तिन्ही कार्यक्रमांसाठी जिल्ह्याच्या भौगोलिक, सांस्कृतिक व आर्थिक पार्श्वभूमीनुसार माहिती शिक्षण व संवाद संदर्भात कृती आराखडा (IEC Action Plan) तयार करणे.

३. जिल्ह्याचे संवाद धोरण ठरविण्यासाठी IEC Strategy Paper तयार करुन नाविन्यपुर्ण कार्यक्रमांचे आयोजन करणे.

४. पाणी व स्वच्छतेच्या व्यापक विषयांसाठी Social Networks (विविध सामाजिक संस्था, उदा.लायन्स क्लब, रोटरी क्लब, पर्यावरणावर काम करणारे नेटवर्क्स इ.) कल्चरल नेटवर्क्स (उदा.वारकरी मंडळ, किर्तनकार, महाविद्यालयाचे सांस्कृतिक विभाग, सांस्कृतिक संघटना इ.) यांच्या मदतीने संदेश प्रसारण करण्यासाठी या सर्वांशी समन्वय करुन अंमलबजावणी करणे. प्रत्येक वर्षी उपरोक्त सर्व बाबींच्या सूची अद्ययावत करणे.

५. आधुनिक माध्यमांचा प्रभावीपणे वापर होण्यासाठी इंटरनेट वरील विविध सामाजिक संकेत स्थळावर समूह तयार करुन किंवा नोंदणी करुन विभागाकडून वेळोवेळी तयार करण्यात आलेल्या संदेशांचे प्रसारण करणे, वर्तन बदल (BCC) प्रक्रियेसाठी स्थानिक स्थितीचा अभ्यास करुन PRA गृहभेटी, CLTS, Cross Learning यासारख्या कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन करणे.

६. स्थानिक साधन व्यक्तींची सूची (रिसोर्स पर्सन प्रोफाईल) तयार करणे. (उदा.चांगले कवी, फोटोग्राफर्स, वक्ते इत्यादी)

७. जिल्हा स्तरावर महिना व वर्षनिहाय शिक्षण व संवाद आराखडा तयार करणे व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी सुविधाकर्त्याची (फॅसिलिटेटर) भुमिका निभावणे.

८. इतर विभागांशी समन्वय साधून गावनिहाय, तालुकानिहाय व जिल्हानिहाय IEC उपक्रम राबविण्याकरीता मार्गदर्शन करणे.

९. प्रकल्प/योजनांच्या अंमलबजावणीमधील त्रुटी वेळोवेळी वरिष्ठांच्या निदर्शनास आणून देणे व त्याबद्दलच्या उपाययोजनांद्वारा कालबध्द अभियानाबाबत सूचना करणे.

१०. संदेश प्रसारणानुसार (संदेश संकलन) / साहित्याची निर्मिती व प्रदर्शन करण्यासाठी मार्गदर्शन करणे.

११. प्रकल्पाच्या आवश्यकतेनुसार डॉक्युमेंटेशन करणे.

१२. प्रमाणित प्रशिक्षक तयार करणे.

१३. विविध उपक्रम, अभियाने व विषयानुरुप तयार केलेल्या संदेशांचा व माध्यम साधनांचा परिणाम अभ्यासण्यासाठी इम्पॅक्ट स्टडीज चे आयोजन करणे. त्याचप्रमाणे केंद्र व राज्य स्तरावरुन सूचविलेल्या स्टडीज आयोजित करणे.

१४. संसाधन व्यक्ती / संसाधने यांची सूची तयार करणे, सूची अद्ययावत करणे, अंमलबजावणी करणे, समन्वय ठेवणे.

प्रत्येक महिन्याला किमान १० क्षेत्रभेटी करणे. शक्य झाल्यास निवासी क्षेत्र भेटी देणे.

## मनुष्यबळ विकास शाखा

१. विविध पातळ्यांवरील प्रशिक्षणाची गरज ओळखून प्रशिक्षण कार्यक्रम तयार करणे.

२. संपूर्ण स्वच्छता कार्यक्रम, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम व पाणी गुणवत्ता या विषयानुसार जिल्ह्यातील लाभार्थ्यांची (स्टेक होल्डर्स) यादी तयार करणे.

३. ट्रेनिंग नीड असेसमेंट प्रकल्प चक्रानुसार प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण करुन अहवाल तयार करणे.

४. जिल्हा पातळीवर सर्व स्तराचा व लाभार्थी / लक्षीत घटकांचा विचार करुन क्षमता बांधणी आराखडा तयार करणे.

५. प्रत्येक प्रशिक्षणाचे मॉड्यूल तयार करणे. संसाधन / तज्ञ व्यक्तींची /संस्थांची यादी तयार करणे व समन्वय साधणे.

६. प्रशिक्षणांचे अहवाल तयार करुन प्रशिक्षण केंद्रांची माहिती वरिष्ठ पातळीवर सादर करणे..

७. जिल्हा/तालुका/गावनिहाय प्रशिक्षणाचे नियोजन आराखडे तयार करणे. क्षमता बांधणी विषयक अंदाजपत्रक, कृती आराखडा तयार करणे.

८. प्रकल्प अंमलबजावणीमध्ये टप्पानिहाय लोकसहभागाचे महत्व कळावे यासाठी ग्रामपंचायत आणि ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती यांना प्रेरित करणे.

९. वेळोवेळी विविध स्तरावर अभ्यास सहलींचे आयोजन करणे. ग्रामस्तरावर पीएलए/पीआरए, मायक्रो प्लॅनिंग पध्दतीचा अवलंब करुन सहभागीय प्रक्रिया वृध्दींगत करणे.

१०. क्षमता बांधणी प्रशिक्षणाचे मुल्यमापन करुन आवश्यक त्या सुधारणा सुचविणे, प्रमाणित प्रशिक्षक तयार करणे.

११. प्रकल्प अंमलबजावणीमधील क्षमता बांधणीविषयी त्रुटी वरीष्ठ पातळीवर निदर्शनास आणून देणे व त्याबाबत उपाययोजना सुचविणे.

१२. राष्ट्रीय/राज्य/जिल्हा पातळीवरील प्रशिक्षणासाठी नामनिर्देशन मागविणे व पाठविणे.

१३. जिल्हास्तरीय/तालुकास्तरीय/गावस्तरीय प्रशिक्षणांचे व अन्य संस्थेकडील प्रशिक्षणांचे संनियंत्रण व मुल्यमापन करणे व त्यात आवश्यक असल्यास सुधारणा सुचविणे.

१४. प्रत्येक महिन्याला किमान १० क्षेत्रभेटी करणे. शक्य झाल्यास निवासी क्षेत्र भेटी करणे.

## लेखा शाखा

१. लेखांकन स्थिती अभ्यासणे व त्याबाबत मार्गदर्शन करणे

२. लेखांविषय व संपादणूक विषयक मार्गदर्शन करणे.

३. संपादनुक प्रकिया सोपी होण्यासाठी निविदा/दरपत्रके यांचे प्रारुप गावपातळीवर पोहोचविणे. ते मराठी भाषेत उपलब्ध करुन देणे.

४. जिल्ह्याच्या लेख्यासंबंधी माहिती वेळोवेळी एम ॲन्ड ई च्या मदतीने ऑनलाईन भरणे.

५. ग्राम पंचायतीने/समितीने नियुक्त केलेल्या व्यक्तीला लेखा विषयक प्रशिक्षण देण्यासाठी मनुष्यबळ विकास सल्लागार यांच्या मदतीने मॉड्युल तयार करणे व त्याची अंमलबजावणी करणे.

६. वार्षिक लेखा परिक्षणासाठी जिल्हा चमुला मदत करणे.

७. मासिक लेखा अहवाल तयार करण्यामध्ये मदत करुन राज्यस्तरापर्यंत पोहोचविणे.

८. सनदी लेखापालाची सूची बनविण्यासाठी मदत करणे.

९. ई-टेंडरींग बद्दल जागृती करणे व ग्रामपंचायत/ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीला मार्गदर्शन करणे/ प्रशिक्षण देणे.

१०. उपयोगिता प्रमाणपत्र विहित मुदतीत राज्य स्तरावर सादर करण्यासाठी मदत करणे.

११. मासिक खर्च प्रपत्र सादर करणे व ऑनलाईन अपडेट करणे.

१२. प्रत्येक महिन्याला किमान १० क्षेत्रभेटी देणे व शक्य झाल्यास निवासी क्षेत्र भेटी देणे.

## संनियंत्रण व मुल्यमापन शाखा (M & E Cell)

१. वस्तीनिहाय (Habitation wise) अद्यावत माहिती संकलीत करणे. (Basic Habitation Information)

२. TSC/NRDWP/NRWQM या कार्यक्रमांची माहिती नियमितपणे Online Update होत आहे अथवा नाही ते पाहणे.

३. वेगवेगळ्या माहितीच्या संकलनातून Online किंवा Offline माहितीच्या आधारे नियमितपणे TSC/NRDWP/NRWQM कार्यक्रमाचे विविध प्रकारे विश्लेषण करुन वरिष्ठांना सातत्याने अवगत करणे.

४. संबंधीत शाखा, संस्था, व्यक्ती/अधिकारी यांच्याकडून उपयुक्त माहितीचे संकलन (Data Collection) करणे.

५. उपलब्ध माहितीचे विश्लेषण (Data Analysis) करुन आकर्षक पध्दतीने मांडणी करुन अहवाल सादर करणे.

६. PIP/AIP आराखडा तयार करण्यासाठी मदत करणे.

७. विषय निहाय प्रकल्पातील कामाबाबतचे सुक्ष्म संनियंत्रण करुन त्याबाबत असलेल्या त्रुटी किंवा उणिवा नियमीतपणे वरिष्ठांच्या निदर्शनास आणून देणे. (Software & Hardware Component)

८. विषय निहाय उपक्रमांचे Reporting System विकसित करुन अहवाल सादर करणे.

९. योजनांचे प्रमुख चार टष्यांवर पायाभुत, मध्यवर्ती, अंतरीम प्रारुप मुल्यांकन करणे.

१०. इतर सर्व घटकांच्या (Components) च्या समन्वयाने Impact Study करणे.

११. Evaluation Study साठी व्यक्ती/संस्था यांची सूची (Empanelment) तयार करणे व त्यांचे प्रशिक्षण पुर्ण करुन इतर अनुषंगिक सुविधा पुरविणे.

१२. Cross Monitoring साठी प्रत्येक महिन्याला किमान १० क्षेत्रभेटी कराव्यात, शक्य झाल्यास निवासी क्षेत्रभेटी देणे.

१३. शासनाकडून पाणी पुरवठा व स्वच्छता संदर्भात वेळोवेळी निर्गमित होणारे शासन निर्णय/ परिपत्रके/आदेश/पत्र यांच्या प्रती इंटरनेटवरुन प्राप्त करुन त्या वरिष्ठ अधिकारी तसेच ग्राम स्तरावर उपलब्ध करुन देणे.

**पाणी गुणवत्ता शाखा**

१. राज्य स्तरावरुन वेळोवेळी आखण्यात आलेल्या पाणी गुणवत्ता कार्यक्रमाची यशस्वी अंमलबजावणी करण्याकरीता विशेष प्रयत्न करणे.

२. पाणी स्त्रोतांची Online माहिती नियमितपणे अद्यावत करणे व त्यानुसार Loading करणे. (लोकसंख्येनुसार)

३. जिल्ह्यांचे Water Quality Profile बनविणे.

४. लाल कार्ड/पिवळे कार्ड यांचे रुपांतर हिरवे कार्ड होण्यासाठी पाणी गुणवत्ता निरीक्षकाच्या सहाय्याने संबंधीत खात्याशी समन्वय ठेवून पाठपुरावा करणे.

५. पाणी गुणवत्ता सल्लागार यांनी ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, आरोग्य विभाग, ग्राम पंचायत विभाग व पाणी तपासणाऱ्या प्रयोगशाळा यांच्याशी समन्वय साधून कामकाज पाहणे.

६. दरमहा तालुका स्तरीय पाणी गुणवत्ता समित्यांच्या सभा होत आहेत अथवा नाहीत याचा आढावा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर करणे तसेच या सभांना वेळोवेळी उपस्थित राहणे.

७. जिल्हा स्तरावर पाणी गुणवत्ता समितीची दरमहा बैठक अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी (सचिव, जिल्हा पाणी गुणवत्ता समिती) यांच्या समन्वयाने आयोजित करणे.

८. पाणी गुणवत्ता संनियंत्रणासाठी शासनाने वेळोवेळी काढलेले शासन निर्णय, सूचना, परिपत्रके याबाबत जिल्हा स्तरावरुन पाठपुरावा करणे.

९. जलसुरक्षकांचे प्रशिक्षण, क्षमता बांधणी, मानधन, मुल्यमापन व आढावा याबाबत पाठपुरावा करणे.

१०. पाणी गुणवत्ता बाधीत, जलजन्य आजारांचा साथीचा उद्रेक झालेल्या गावांमध्ये जाऊन ग्रामस्थांना मार्गदर्शन करणे व उपाययोजना बाबत पाठपुरावा करणे.

११. ग्रामसेवक, आरोग्य कर्मचारी, जलसुरक्षक यांनी पाणी नमुने, टीसीएल नमुने, स्वच्छता सर्वेक्षण पाणी तपासणीत आढळून आलेल्या दुषित नमुन्यांबाबत करण्यात आलेली कार्यवाही, याबाबत मार्गदर्शन करणे व आढावा घेणे.

१२. पाणी गुणवत्ता विषयक सर्व अहवालांचे एकत्रीकरण करणे व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षरीने विभागीय आयुक्त व शासनास अहवाल सादर करणे.

१३. पाणी गुणवत्ता विषयक अहवालांची केंद्र शासनाच्या संकेत स्थळावर नोंद होत आहे अथवा नाही हे पाहणे व याबाबत अडचणी असल्यास वरिष्ठांच्या निदर्शनास आणून देऊन कार्यवाही करुन घेणे.

१४. स्वच्छता सर्वेक्षण वर्षातून दोन वेळा विहित कालावधीत पुर्ण होण्यासाठी नियोजन करणे.

१५. स्वच्छता सर्वेक्षणात लाल कार्ड वितरीत झालेल्या ग्रामपंचायतींना/ स्त्रोतांना भेटी देऊन तेथील त्रुटी दूर करण्याबाबत पाठपुरावा करणे.

१६. शासनाकडून पाणी गुणवत्ता विषयक वितरीत झालेल्या विविध साहित्याचे (Field Test Kits, IEC Materials, etc.) जिल्ह्यात वितरण व संनियंत्रण करणे.

१७. शासनाकडून पाणी गुणवत्ताविषयक वितरीत झालेल्या निधीचे संनियंत्रण करुन शासनास वेळोवेळी उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे.

१८. शासनाच्या पाणी गुणवत्ताविषयक आयोजित होणाऱ्या सभा, कार्यशाळा, प्रशिक्षण इत्यादींसाठी हजर राहणे.

१९. प्रत्येक महिन्याला किमान १० क्षेत्रभेटी करणे, शक्य झाल्यास निवासी क्षेत्रभेटी देणे.

**स्वच्छता शाखा**

१. निर्मल भारत अभियान/ स्वच्छ भारत अभियान जिल्हा वार्षिक कृती आराखडा (AIP) तयार करणे.

२. Progress implementation plan (PIP) तयार करणे.

३. Baseline (MPR) Monthly progress report तालुक्याकडून घेऊन भरणे.

४. विविध राज्यस्तरीय/केंद्रस्तरीय बैठकांसाठी वेळेत माहिती देणे, अहवाल व सादरीकरण तयार करणे.

५. संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाचे संनियंत्रण करणे, पुरस्कार रक्कमांच्या वितरणात लेखा विभागास सहाय्य करणे.

६. निर्मल ग्राम Online Report अद्ययावत करणे.

७. सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाचे नियोजन व कार्यवाही आणि अंमलबजावणी यावर संनियंत्रण ठेवणे.

८. MPR वेळेत भरले जातील, याची दक्षता घेणे.

९. माहिती शिक्षण व संवाद तसेच मनुष्यबळ संसाधन कक्षाला स्वच्छता अहवालाचे विश्लेषण करुन वेळोवेळी मार्गदर्शक सूचना देणे.

१०. शालेय स्वच्छतागृहे व अंगणवाडी शौचालय उद्दिष्टपुर्तीसाठी प्रयत्नशील राहणे.

११. स्वच्छता व आरोग्य याबाबतीत स्वच्छता तज्ञांना मार्गदर्शन करणे.

१२. निर्मल ग्राम साठी प्रयत्न करणे. तालुका/ग्रामपंचायतींना मार्गदर्शन करणे.

१३. निर्मल ग्राम पुरस्कार कार्यक्रमात सहभागी होणे.

१४. शिक्षण विभाग, आरोग्य विभाग यांच्या समन्वयाने विविध नाविन्यपुर्ण उपक्रमांचे आयोजन करणे.

१५. निर्मल भारत अभियानाशी/ स्वच्छ भारत अभियानाशी संबंधीत इतर सर्व अनुषंगिक बाबी हाताळणे.

**आस्थापना शाखा**

१. जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षातील जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, विषयतज्ञ, सल्लागार, लेखाधिकारी, डेटा एंट्री ऑपरेटर, शिपाई या कर्मचाऱ्यांच्या सर्व सेवाविषयक बाबी हाताळणे.

२. निर्मल भारत अभियान/स्वच्छ भारत अभियानाशी संबंधीत तसेच राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाशी संबंधीत सर्व प्रकारची माहिती ऑनलाईन अद्ययावत करणे.

## जोडपत्र-४

(शासन निर्णय क्रमांक : ग्रापाधो-१११५/प्र.क्र.२३/पापु-०७, दिनांक : ०३ मार्च, २०१५ सोबतचे जोडपत्र)

## जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद, पालघर येथील कंत्राटी कर्मचाऱ्यांना द्यावयाच्या ओळखपत्राचा नमुना

समोरील बाजू

राजमुद्रा

**जिल्हा परिषद पालघर**
**जिल्हा पाणी स्वच्छता मिशन कक्ष**

.............................................................................................

फोटो

नाव :
पदनाम :
रक्तगट :
ओळखपत्र क्रमांक :
दूरध्वनी क्रमांक :
करार कालावधी :

**धारकाची स्वाक्षरी**

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी**
**(ग्रामपंचायत/ पाणी व स्वच्छता)**

मागील बाजू

**करार तत्वावरील कर्मचाऱ्यांचे ओळखपत्र**

१. हे ओळखपत्र जपून ठेवावे.
२. या ओळखपत्राचा गैरवापर केल्यास कारवाई करण्यात येतील.
३. कर्मचाऱ्याचा करार कालावधी संपुष्टात आल्यानंतर अथवा सेवा सोडल्यानंतर अथवा सेवा संपुष्टात आणल्यास हे ओळखपत्र जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षास परत करावे.
४. हे ओळखपत्र सापडल्यास कृपया संबंधित कार्यालयाकडे पाठवावे.

**ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल**
**दुरुस्तीबाबत सुधारित मार्गदर्शक सूचना**

# महाराष्ट्र शासन

## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

## शासन शुध्दीपत्रक क्रमांकः ग्रापाधो-१११४/प्र.क्र.५२/पापु-०७

७ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई-४०० ००१
तारीख: १० मार्च, २०१५

**वाचा:**

१) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो-१११४/प्र.क्र.५२/पापु-०७, दिनांक १७ ऑक्टोबर,२०१४
२) **महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पत्र क्रमांकः** मजीप्रा/सस/तांशा-३/११४७, दिनांक ०२ डिसेंबर,२०१४

**प्रस्तावना :**

संदर्भाधिन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या असून या शासन निर्णयातील तरतुदीनुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत देखभाल दुरुस्ती करण्यात येत असलेल्या योजनांच्या बाबतही पाणीपट्टी व शासन अनुदानाची रक्कम संबंधित जिल्हा देखभाल दुरुस्ती निधीत जमा करण्याचे व सदर रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास जिल्हा परिषदांमार्फत वितरीत करण्याचे निश्चित केले आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत संचलन व देखभाल दुरुस्ती केल्या जात असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजना तोट्यात असल्याने या योजनांच्या संचलन व देखभाल दुरुस्तीकरीता निधी उपलब्ध करुन देण्याची विनंती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने संदर्भाधिन क्र.०२ येथील पत्रान्वये केली आहे.

सद्य:स्थितीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत देखभाल दुरुस्ती केल्या जात असलेल्या तोट्यातील योजनांचा तोटा भरुन काढण्यासाठी विभागाकडे पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदान स्वरुपातील मदत जिल्हा परिषदांमार्फत उपलब्ध करुन देण्याऐवजी थेट उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने संदर्भाधिन क्र.१ येथील शासन निर्णयात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन शुध्दीपत्रक :**

शासन निर्णय क्र.ग्रापाधो-१११४/प्र.क्र.५२/पापु-०७, दि.१७ ऑक्टोबर,२०१४ रोजीच्या शासन निर्णयातील अ.क्र. (२) जिल्हास्तरीय देखभाल व दुरुस्ती निधी यामधील "महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत देखभाल दुरुस्ती करण्यात येणाऱ्या योजनांच्या बाबतीत पाणीपट्टी व शासन अनुदानाची रक्कम संबंधित जिल्हा देखभाल दुरुस्ती निधीतच जमा राहील. सदर रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास जिल्हा परिषदांमार्फत वितरीत करण्यात येईल." ही तरतूद या शासन शुध्दीपत्रकान्वये रद्द करण्यात येत आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण संचलन व देखभाल दुरुस्ती करीत असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना देखभाल दुरुस्ती प्रोत्साहन अनुदानाची रक्कम शासनामार्फत थेट महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास अदा करण्यात येईल.

दि.१७ ऑक्टोबर,२०१४ रोजीच्या शासन निर्णयामधून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास सुट देण्यात येत असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण संचलन व देखभाल दुरुस्ती करीत असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी स्वत:ची देखभाल दुरुस्ती प्रक्रिया राबविण्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास मुभा देण्यात येत आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण संचलन व देखभाल दुरुस्ती करीत असलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा तोटा भरुन काढण्याचा निर्णय निधीची उपलब्धता झाल्यानंतर यथावकाश घेण्यात येईल.

सदर शासन शुध्दीपत्रकातील तरतुदी या शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत लागू राहतील. शासनाचे यासंदर्भातील पुढील आदेश झाल्यानंतर या शुध्दीपत्रकातील तरतुदी आपोआप रद्द होतील.

सदर शासन शुध्दीपत्रक हे महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक 201503091451586028 असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SAVRIKAR AJAY KISHANRAO

Digitally signed by SAVRIKAR AJAY KISHANRAO
DN: CN = SAVRIKAR AJAY KISHANRAO, C = IN, S = Maharashtra, O = WATER SUPPLY AND SANITATION DEPARTMENT, OU = WATER SUPPLY AND SANITATION,CID - 917821
Date: 2015.03.10 12:54:27 +05'30'

**(अजय सावरीकर)**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

२. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. सर्व सन्माननीय विधिमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई.
६. मा.मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
९. विभागीय आयुक्त (सर्व)
१०.संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
११.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१२.संचालक, समाज कल्याण संचालनालय, पुणे.
१३.संचालक, पाणी व स्वच्छता सहाय संस्था, बेलापूर, नवी मुंबई.
१४.महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
१५.महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
१६.मुख्य अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
१७.अधीक्षक अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
१८.कार्यकारी अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
१९.कार्यकारी अभियंता (सर्व), ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
२०.मंत्रालयीन इतर सर्व विभाग व त्यांच्या अधिनस्त असलेली सर्व कार्यालये.
२१.पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने.
२२.निवडनस्ती, कार्यासन पापु-०७.

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षामध्ये
कार्यरत असलेल्या कंत्राटी महिला
कर्मचाऱ्यांच्या प्रसुती रजेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः ग्रापाधो-१११५/प्र.क्र.३३/पापु-०७**
७ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई- ४०० ००१
तारीखः २० मार्च, २०१५

**वाचा :**

१) **शासन निर्णय क्रमांकः** संकीर्ण-२०१२/प्र.क्र.७२/पापु-०७, दिनांक १ नोव्हेंबर,२०१२

**प्रस्तावना :**

संदर्भाधिन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) यांच्या संनियंत्रणाखालील संपुर्ण स्वच्छता अभियान कक्ष (TSC) व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद यांच्या संनियंत्रणाखालील जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष (DWSM Cell) यांचे विलिनीकरण करुन एकीकृत जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाची स्थापना करण्यात आली आहे व यामध्ये कार्यरत असलेल्या सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांचे/सल्लागारांचे समायोजन करण्यात आलेले आहे.

संदर्भाधिन क्र.१ येथील शासन निर्णयामध्ये एकीकृत जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षामध्ये कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचारी/सल्लागार यांच्या रजेबाबत उल्लेख करण्यात आला असून कंत्राटी स्वरुपातील कर्मचाऱ्यांना १० दिवस नैमित्तीक रजा व १५ दिवस वैद्यकिय रजा अनुज्ञेय करण्यात आलेली आहे. तथापि, या शासन निर्णयामध्ये जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षात कार्यरत असलेल्या कंत्राटी महिला कर्मचाऱ्यांना आवश्यक असलेल्या प्रसुती रजेचा उल्लेख नाही.

राज्यातील जिल्हा परिषदांमधील जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षामध्ये कार्यरत असलेल्या अनेक कंत्राटी महिला कर्मचाऱ्यांकडून प्रसुती रजा अनुज्ञेय करण्याची विनंती वारंवार शासनास होत आहे. शासनास प्राप्त होत असलेल्या मागण्या, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या प्रसुती रजा तसेच राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत असलेल्या कंत्राटी महिला कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या प्रसुती रजा या बाबींचा विचार करुन जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षामध्ये कार्यरत असलेल्या कंत्राटी महिला कर्मचाऱ्यांकरीता प्रसुती रजा अनुज्ञेय करण्यासाठी धोरण ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

३०/३/२०१५

**शासन परिपत्रक :**

प्रस्तावनेत नमुद केलेली वस्तुस्थिती विचारात घेऊन जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षामध्ये कार्यरत असलेल्या कंत्राटी महिला कर्मचाऱ्यांना खालीलप्रमाणे प्रसुती रजा सक्षम प्राधिकारी स्तरावर मंजूर करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षामध्ये कार्यरत असलेल्या कंत्राटी महिला कर्मचाऱ्यांना अर्ज केल्याच्या तारखेस, दोन किंवा त्याहून अधिक हयात मुले नसतील तर, सक्षम प्राधिकारी रजा सुरु झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या कालावधीची प्रसुती रजा मंजूर करु शकेल. अशा कालावधीत, रजेवर जाण्याच्या लगतपुर्वी तिला जेवढे मानधन मिळत असेल तेवढेच रजा मानधन देण्यात येईल. परंतु, संबंधित महिला कर्मचाऱ्यास रजा उपभोगून कामावर रुजू झाल्यानंतर ११ महिन्यांचा कंत्राट कालावधी पूर्ण करणे बंधनकारक राहील. पुढील कंत्राट कालावधीपेक्षा कमी कालावधीत संबंधित महिला कर्मचाऱ्याने राजीनामा दिल्यास अथवा अन्य कोणत्याही मार्गाने सेवा सोडून दिल्यास रजा कालावधीतील मानधन वसुल करण्यात येईल.

सदर परिपत्रकातील तरतुदी या पाणी व स्वच्छता सहाय संस्था, बेलापूर व सुधारणा सहाय्य आणि प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, बेलापूर यामध्ये कार्यरत असलेल्या महिला कर्मचाऱ्यांनाही लागू राहतील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१५०३२०१५३०४२८९२८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SAVRIKAR AJAY KISHANRAO

Digitally signed by SAVRIKAR AJAY KISHANRAO
DN: CN = SAVRIKAR AJAY KISHANRAO, C = IN, S = Maharashtra, O = WATER SUPPLY AND SANITATION DEPARTMENT, OU = WATER SUPPLY AND SANITATION,CID - 917821
Date: 2015.03.20 17:10:22 +05'30'

**(अजय सावरीकर)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

५. सर्व सन्माननीय विधिमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई.
६. मा.मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
९. विभागीय आयुक्त (सर्व)
१०.संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
११.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१२.संचालक, समाज कल्याण संचालनालय, पुणे.
१३.संचालक, पाणी व स्वच्छता सहाय संस्था, बेलापूर, नवी मुंबई.
१४.महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
१५.महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
१६.मुख्य अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
१७.अधीक्षक अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
१८.कार्यकारी अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
१९.कार्यकारी अभियंता (सर्व), ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
२०.मंत्रालयीन इतर सर्व विभाग व त्यांच्या अधिनस्त असलेली सर्व कार्यालये.
२१.पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने.
२२.निवडनस्ती, कार्यासन पापु-०७.

—०x०—

**ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या दरडोई खर्चाच्या निकषात सुधारणा करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांकः ग्रापाधो-१११४/प्र.क्र. ८१/पापु-०७**
७ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल, लोकमान्य टिळक मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४००००१
तारीख: २७ मार्च, २०१५

**वाचा :-**

१) शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१२०८/प्र.क्र.५२/पापु-०७, दिनांक ९ ऑक्टोबर, २०१३

**शासन शुध्दीपत्रक :-**

संदर्भाधिन शासन निर्णयान्वये राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या दरडोई खर्चाचे सुधारित निकष लागु केले असून, या शासन निर्णयातील तरतूदीनुसार विहित दरडोई खर्चाच्या निकषाच्या १०० टक्के पर्यंत अधिक दरडोई खर्च असणाऱ्या योजनांना पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून शासन स्तरावरुन मान्यता देण्याचे निश्चित केले आहे.

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत राज्यातील ग्रामीण भागात राबविण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा योजनांच्या जिल्हा वार्षिक कृती आराखड्याच्या आर्थिक व भौतिक प्रगतीचे संनियंत्रण करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदांची आहे. परंतु ग्रामीण पाणी पुरवठा योजनांना प्रशासकीय मान्यता देण्याचे पुरेसे अधिकार जिल्हा परिषदांना नसल्यामुळे जिल्हा परिषदेस जिल्ह्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या आर्थिक व भौतिक प्रगतीचे संनियंत्रण करणे शक्य होत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची संपूर्ण तपासणी व छाननी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद व कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद यांचेकडून होण्यासाठी तसेच शासन यंत्रणेवरील राज्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या मान्यतेचा भार कमी करण्यासाठी संदर्भाधिन शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या दरडोई खर्चाच्या सुधारित निकषांच्या अधिकच्या योजनांच्या मान्यते करीता असलेल्या तरतूदींमध्ये पुढील प्रमाणे बदल करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | शासन निर्णयातील यापूर्वीची तरतूद | शासन निर्णयातील सुधारित तरतूद |
|---|---|---|
| १ | जास्तीत जास्त योजना विभागाच्या स्तरावर निकाली निघाव्यात याकरीता उपरोक्त विहित निकषांचा १०० टक्के पर्यंत जास्त दरडोई खर्च असलेल्या योजनांना पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून शासन स्तरावरुन मान्यता देण्यात येईल. | विहित दरडोई खर्चाच्या निकषाच्या ५० टक्के पर्यंत अधिक दरडोई खर्च असणाऱ्या पाणी पुरवठा योजनांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या स्तरावरुन मान्यता देण्यात येईल. |
| | | विहित दरडोई खर्चाच्या निकषाच्या अधिक ५० टक्के ते १०० टक्के पर्यंतच्या दरडोई खर्च असणाऱ्या योजनांना पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून शासन स्तरावरुन मान्यता देण्यात येईल. |

या शासन शुध्दीपत्रकातील उपरोक्त सुधारणा तात्काळ लागु होतील.

संदर्भाधिन शासन निर्णयातील इतर तरतूदी पूर्वीप्रमाणेच कायम राहतील.

सदर शासन शुध्दीपत्रक हे महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201503271323599428 असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SAVRIKAR AJAY KISHANRAO

Digitally signed by SAVRIKAR AJAY KISHANRAO
DN: CN = SAVRIKAR AJAY KISHANRAO, C = IN, S = Maharashtra, O = WATER SUPPLY AND SANITATION DEPARTMENT, OU = WATER SUPPLY AND SANITATION,CID 917821
Date: 2015.03.27 16:17:49 +05'3(

**(अजय सावरीकर)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०००३२
३. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०००३२
४. मा.मंत्री, (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०००३२
५. मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०००३२

६. मा.राज्यमंत्री, (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०००० ३२
७. मा.विधानसभा/ विधानपरिषद सदस्य (सर्व)
८. विभागीय आयुक्त (सर्व)
९. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
१०.आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
११.संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
१२.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा (सर्व)
१३.संचालक, पाणी व स्वच्छता सहाय संस्था, बेलापूर, नवी मुंबई.
१४.मुख्य अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.
१५.प्रादेशिक उपसंचालक (सर्व), भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा.
१६.मुख्याधिकारी, नगरपरिषदा (सर्व)
१७.अधीक्षक अभियंता (सर्व)
१८. कार्यकारी अभियंता (सर्व)
१९. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
२०. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
२१. मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
२२. गटविकास अधिकारी, पंचायत समित्या (सर्व)
२३. मंत्रालयीन सर्व विभाग व त्यांच्या अधिनस्त असलेली सर्व कार्यालये.
२४. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने, मंत्रालय, मुंबई.
२५. निवडनस्ती (कार्यासन, पापु-०७)

**ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या त्रयस्थ तांत्रिक परिक्षणासाठी मार्गदर्शक सूचना.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः ग्रापाधो-१११४/प्र.क्र.६१/पापु-०७**
७ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल, मंत्रालय,
मुंबई-४०० ००१
तारीख: १५ जून, २०१५

वाचा :

१) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो-१११४/प्र.क्र.२२/पापु-०७, दिनांक ९ जुलै,२०१४
२) **शासन निर्णय क्रमांकः** ग्रापाधो-११०९/प्र.क्र.१०४(अ)/पापु-०७, दिनांक १७ मार्च,२०१०

**प्रस्तावना :**

ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रात सुधारणा तसेच विकेंद्रीकरण घडवून आणण्यात महाराष्ट्र राज्य देशात अग्रेसर आहे. राज्याच्या ११२.४ दशलक्ष लोकसंख्येपैकी ६१.८ दशलक्ष (सुमारे ५५%) लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. राज्याचा लोकसंख्येच्या दृष्टिने देशात दुसरा तर क्षेत्रफ़ळाच्या बाबतीत तिसरा क्रमांक लागतो. राज्यात ३३ जिल्हे असून त्यामध्ये २८,८१३ ग्रामपंचायतीचा व सुमारे ९८,८४२ वस्त्यांचा समावेश होतो.

राज्य शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत पाणी पुरवठा व स्वच्छता विषयक बाबींसंबंधी धोरणे ठरविणे, कार्यक्रमाची अंमलबजावणी व देखरेख या बाबी प्रामुख्याने हाताळल्या जातात. जिल्हा पातळीवर जिल्हा परिषदा व गाव पातळीवर ग्राम पंचायती ह्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करणाऱ्या प्रमुख संस्था आहेत. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा या राज्य स्तरावरील तांत्रिक संस्थामार्फत तांत्रिक तज्ञ/कर्मचारी (जिल्हा परिषदावर प्रतिनियुक्तीने), तसेच गरजेनुसार तांत्रिक सहाय्य पुरविले जाते. क्षेत्रिय/प्रादेशिक स्तरावरील वेगवेगळ्या संस्थामध्ये त्यांची भूमिका आणि जबाबदाऱ्या यांची व्यवस्थित मांडणी करण्यात आलेली असली तरी आजही त्यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमाच्या नियोजन, अंमलबजावणी व देखरेख यामध्ये समन्वयाचा अभाव आहे.

संदर्भाधीन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी तांत्रिक मान्यता, प्रशासकीय मान्यता, अंमलबजावणी, त्रयस्थ तांत्रिक परीक्षण व देखभाल दुरुस्तीबाबत सुधारित

रोटा/एच-६५६[१,०००-६-२०१५]-१

मार्गदर्शक सुचना पारित करण्यात आल्या आहेत. याच शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करणे बंधनकारक करण्यात आले असून, त्रयस्थ तांत्रिक परीक्षणाची सविस्तर कार्यपद्धती व त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करण्यासाठी निश्चित करावयाच्या संस्था/ यंत्रणा याबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्याचे नमूद केले आहे.

वरील बाबींचा विचार करून, केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमामार्फत महाराष्ट्र शासनाला ग्रामीण पाणीपुरवठा कार्यक्रमास सहाय्य करण्यासाठी निधी प्राप्त होत असल्याने कार्यक्रमातंर्गत करण्यात येणाऱ्या पाणी पुरवठ्याच्या कामांची स्वतंत्रपणे पडताळणी (त्रयस्थ तांत्रिक परीक्षण) करणे आवश्यक असल्याची विचारधारा शासनाच्या समोर आली आहे. यास्तव ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करण्यासाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना पारित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

## शासन निर्णय :

प्रस्तावनेत नमुद केलेली वस्तुस्थिती विचारात घेवून ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करणे बंधनकारक करण्यात येत आहे. जिल्ह्यातील सर्व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करुन घेण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील. जिल्ह्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे प्रभावी त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करण्यासाठी पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

**१. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करण्याची आवश्यकता :**

१. केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम हा राज्यात उल्लेखनीयरित्या पार पाडण्यात येत आहे. या कार्यक्रमामुळे विकेंद्रीकरणास तसेच मागणी-पुरवठा पध्दतीच्या बळकटीकरणास चालना मिळाली असली तरी आजही सेवा पुरविण्यात राज्यासमोर लक्षणीय आव्हाने निर्माण झाली आहेत.

२. महाराष्ट्र शासनाने मागील काळात पाणी पुरवठा या क्षेत्रात केलेल्या गुंतवणुकीमुळे राज्यातील ९८,००० पेक्षा जास्त वाड्या/वस्त्या/गावांना पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणे शक्य झाले आहे. असे असले तरीही राज्यभरात सरासरी ३० टक्केपेक्षा कमी घरगुती नळ जोडणीद्वारे पुरविण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा सेवेची गुणवत्ता ही हलक्या प्रतीची राहिलेली आहे.

३. तसेच अधुनमधून पाणी पुरवठा, कमी दाब, पाणी गुणवत्ता यासारख्या समस्यांना शासनास सामोरे जावे लागत आहे. याशिवाय वातावरणातील बदलाचा पर्जन्याच्या वितरणावर तसेच पाण्याच्या उपलब्ध स्रोतांवर होणारा परिणाम यासारख्या समस्यांनाही सामोरे जावे लागत आहे.

४. राज्यातील ग्रामीण भागातील वाड्या/वस्त्यांना पुरविण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा सेवेचा दर्जा सुधारावा याकरिता प्रत्येक वर्षी नवीन योजना राबविण्यासाठी तसेच जुन्या योजनांची क्षमता वाढविण्यासाठी त्रयस्थ तांत्रिक परीक्षणाची नितांत आवश्यकता असल्याचे शासनाच्या निदर्शनास येत आहे.

५. महाराष्ट्र हे झपाट्याने शहरीकरण होणारे राज्य असून राज्यातील बरीचशी मोठी गावे (१०,००० पेक्षा जास्त लोकसंख्येची) तसेच नव्याने निर्माण होणारी निम-शहरी गावे ही उच्च प्रतीच्या पाणी पुरवठा सेवेची मागणी करीत आहेत.

**२. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करण्याचा उद्देश :**

१. या कार्यक्रमाचा उद्देश राज्यातील ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता कार्यक्रमाचे नियोजन, अंमलबजावणी व संनियत्रण करणाऱ्या प्रादेशिक यंत्रणांची कार्यक्षमता वाढविणे.
२. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या कामाचा दर्जा उंचावणे व पाण्याची गुणवत्ता वाढविणे.
३. पाणी गुणवत्ता बाधित व टंचाईग्रस्त भागामध्ये गुणवत्तापुर्ण आणि शाश्वत पाणी पुरवठ्याच्या सोयी/सुविधा उपलब्ध करुन देण्यावर भर देणे.
४. घरगुती नळजोडणीची संख्या वाढविणे.
५. पुरेसा दाब व किमान गुणवत्तेसह शाश्वत पाणी पुरवठ्याची हमी देणे.
६. वाढत्या दुष्काळात पिण्याची पाण्याची हमी देणे.

**३. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या त्रयस्थ तांत्रिक परीक्षणाची कार्यपध्दती :**

१. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या प्रगतीचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण किमान २ वेळा करण्यात यावे. (योजनेचे २० ते ३० टक्के काम पुर्ण झाल्यानंतर व ६० ते ७० टक्के काम पुर्ण झाल्यानंतर) तथापि, अंमलबजावणी यंत्रणा यापेक्षा अधिक वेळा योजनेचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करुन घेवू शकतात.
२. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीची वाटचाल/प्रगती जाणून घेण्यासाठी व योजनेच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी (परिणामांचे मोजमाप करण्यासाठी) त्रयस्थ तांत्रिक यंत्रणांनी उद्दिष्टपुर्ती निर्देशक (Success Indicators) ठरवावेत.
३. उद्दिष्टपुर्ती निर्देशक हे दोन प्रकारचे असावेत. अ) निधी वितरणाशी संबंधीत असतील ते "निधी आधारित उद्दिष्टपुर्ती निर्देशक" म्हणून ओळखले जावेत, ब) निधी वितरणाशी संबंधीत नसलेले "इतर उद्दिष्टपुर्ती निर्देशक" म्हणून ओळखले जावेत.

**४. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या त्रयस्थ तांत्रिक परीक्षणासाठी स्वतंत्र पडताळणी यंत्रणा नेमणे :**

१. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमातंर्गत राबविण्यात येणाऱ्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या कामांची गुणवत्ता स्वतंत्रपणे तपासण्यासाठी तसेच त्यांचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण

करण्यासाठी शासकीय अभियांत्रिकी (पदवी/पदविका) महाविद्यालयांच्या, शासकीय आय आय टी (IIT) संस्थांच्या, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे गुणवत्ता व सनियंत्रण पथक, पाणी पुरवठा क्षेत्राशी निगडीत अन्य शासकीय संस्था यांच्या सेवा घेण्यात याव्यात.

२. जिल्ह्यातील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करण्यासाठी अंमलबजावणी यंत्रणांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या मान्यतेने शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये (पदवी/पदविका) तसेच शासकीय आय. आय. टी. (IIT) संस्था, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे गुणवत्ता व सनियंत्रण पथक, पाणी पुरवठा क्षेत्राशी निगडीत अन्य शासकीय संस्था यापैकी एका संस्थेची निवड करावी. या निवडीमध्ये कोणतीही खाजगी संस्था सहभागी असणार नाही याची दक्षता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी घ्यावी.

५. **त्रयस्थ तांत्रिक परीक्षणासाठी नेमलेल्या/नेमावयाच्या स्वतंत्र पडताळणी यंत्रणांची कर्तव्ये:**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या आदेशानुसार ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करावे.

२. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी नेमून दिलेल्या उद्दिष्टांची स्वतंत्रपणे पडताळणी करणे व त्याबाबतचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना व आवश्यकतेप्रमाणे शासनास (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) सादर करावा.

३. साध्य केलेल्या उद्दिष्टपुर्ती निर्देशकांची अचुकता आणि गुणवत्ता, कागदोपत्री तसेच भौतिकदृष्ट्या नियमितपणे तपासावी.

६. **त्रयस्थ तांत्रिक परीक्षणासाठी नेमावयाच्या पडताळणी यंत्रणांच्या सेवेची व्याप्ती :**

१. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करण्यासाठी नेमण्यात आलेल्या / यावयाच्या यंत्रणांनी त्रयस्थ तांत्रिक परीक्षणाची पध्दती विकसित करावी, ज्यामध्ये नमुना योजना, माहितीचा स्त्रोत, माहिती गोळा करण्याची साधने, क्षेत्रीय प्रक्रिया व गुणवत्ता नियंत्रण रेखाकृती यांचा समावेश असेल.

२. योजनेच्या तांत्रिक तसेच भौतिक प्रगतीचे पुनरावलोकन करावे व आवश्यकता असल्यास सुधारणा सुचवाव्यात.

३. पाणी पुरवठा योजनेच्या साध्य केलेल्या उद्देशपुर्ती/प्रतिपुर्ती निर्देशकांची पडताळणी करावी.

४. पडताळणी अहवाल तात्काळ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व आवश्यकता वाटल्यास शासनास (पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास) सादर करावा.

५. महाराष्ट्र शासन आणि अंमलबजावणी यंत्रणा यांच्यात ठरलेल्या सुत्राप्रमाणे व प्रचलित शासन निर्णयांप्रमाणे वितरीत करण्यात आलेल्या निधीची व कामाची पडताळणी करावी.

६. संबंधित अंमलबजावणी यंत्रणेने पुरविलेल्या प्राथमिक माहिती आणि पुराव्याची ऑन-साईट तपासणी आणि पडताळणी करावी.

७. जर एकापेक्षा अधिक कामे असतील तर यादृच्छिकपणे (Randomly) ५ टक्के पेक्षा कमी नसतील इतक्या कामांना भेट देवून पुरविण्यात आलेल्या माहिती आणि पुराव्याची अचुकता तपासावी/पडताळणी करावी.

८. जेथे आवश्यक असेल तेथे लाभार्थी आणि अंमलबजावणी यंत्रणा किंवा इतर संबंधित यांच्यात मुलाखती व चर्चा आयोजित कराव्यात.

**७. त्रयस्थ तांत्रिक परीक्षणाकरीता नेमावयाच्या पडताळणी यंत्रणांच्या निवडीसाठी अनुभव:**

१. निवड करावयाच्या संस्थाना भारतातील ग्रामीण पेयजल व स्वच्छता क्षेत्राचे ज्ञान असावे.

२. या संस्थांच्या निवडीकरिता त्यांना पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रातील किमान १० वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.

३. Mechanical/Electronic/Civil तसेच आय.टी. क्षेत्रातील विविध महत्वाच्या माहितीचे संकलन व हाताळणीचा अनुभव असावा.

४. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या तांत्रिक व भौतिक तपासणीसाठी तांत्रिक तज्ञाचे संघ गठित करण्यासाठी त्रयस्थ यंत्रणा सक्षम असावी.

५. पाणी पुरवठा प्रणाली आणि /किंवा वितरण प्रणाली यांच्या तांत्रिक लेखा परीक्षणाचा किमान ५ वर्षाचा अनुभव असावा.

६. महाराष्ट्रातील पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्राशी संबंधित तांत्रिक मानके, कायदे व शासन निर्णय यांचे संपुर्ण ज्ञान असावे.

७. त्रयस्थ तांत्रिक परीक्षणासाठी नेमलेल्या संघातील (Team) सदस्यांमध्ये ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रातील प्रदीर्घ / व्यापक ज्ञान असावे, तसेच या संघात संस्थात्मक विकासतज्ञ यांचाही समावेश असावा.

८. त्रयस्थ तांत्रिक परीक्षणासाठी नेमलेल्या संघात (Team) किमान १० सदस्यांचा समावेश असावा.

९. त्रयस्थ यंत्रणेतील सदस्यांनी पडताळणी अत्यावश्यक/ अनिवार्य असल्याची विनंती/सुचना प्राप्त होताच त्वरीत हजर झाले पाहिजे.

**८. त्रयस्थ तांत्रिक परीक्षणासाठी पडताळणी यंत्रणा नेमणुकीच्या अटी:**

१. जिल्हा परिषदेतील ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या त्रयस्थ तांत्रिक परीक्षणासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या जिल्ह्याकरिता शासकीय पडताळणी यंत्रणांशी सल्लामसलत करून यादी तयार करावी व त्यास शासनाची मान्यता घेऊन ती प्रसिद्ध करावी.



एच-६५६[१,०००-६-२०१५]-३